हाता. थोड्याच अवधात त्याचा बदलीही झाली. त्यांच्या जागेवर लगेच

जून रोजी कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केरुरे यांचा निरोप

नसल्याने कामे खोळंबली असल्याचे सांगण्यात येत आहे. (वार्ताहर).

सोडल्यानंतर लॅपटॉप, टॅब, मोबाइल चोरीस गेल्याचे लक्षात आले.

# इंटरनेट धोके रोखण्यासाठी संवाद होणे आवश्यक

## अजय शिर्के : 'नेट विश्वातील धोके - घ्यायची काळजी' विषयावर व्याख्यान

नाशिक : व्यक्तींचा प्रत्यक्ष संवाद कमी झाल्यावर त्यांचा आभासी जगाशी संपर्क वाढतो. भारतीय संस्कृतीत एकजुटता असल्याने दहशतवाद, सायबर क्राइम अशा घटनांमध्ये भारतीय लोकांचा सहभाग दिसून येत नाही, ही चांगली बाब असल्याचे मत क्विक हिल फाउंडेशनचे सी.एस.आर. हेड अजय शिर्के यांनी एचपीटी आर्ट्स-आरवायके सायन्स कॉलेज आणि क्विक हिल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नेट विश्वातील धोके आणि घ्यायची काळजी' या विषयावर बोलतांना व्यक्त केले. महाकवी कालिदास कलामंदिरात गुरुवारी (दि. २१) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात पुढे बोलताना अजय शिर्के यांनी सायबर सिक्युरिटी, इथिकल हॅकिंग आणि ई बँकिंग यासंदर्भात उपस्थितांना माहिती दिली. यावेळी संगणक हॅक कसे केले जातात, बँकांच्या सर्व्हरमध्ये कसा बिघाड घडवला जातो, संगणक तसेच मोबाइलमध्ये व्हायरस कसे पाठवले जातात याबाबत स्लाईड शो सह मार्गदर्शन केले. तसेच इंटरनेटचा वापर करताना तसेच एटीएममध्ये जाताना कोणती काळजी घ्यायला हवी, याबाबतही मार्गदर्शन केले. विद्यार्थी तसेच शिक्षकांना मार्गदर्शन करताना २०२० सालापर्यंत 'सायबर सिक्युरिटी ऑफिसर' क्षेत्रात विविध पदांसाठी एक मिलियन नोकर भरती शक्य असल्याचे सांगत त्यादृष्टीने अभ्यास करण्याची, तसेच आपल्यातील कौशल्ये अधिकाधिक विकसित करण्याचे आवाहनही शिर्के यांनी यावेळी केले.

इंटरनेट हाताळताना एकापेक्षा अधिक टॅब किंवा विंडो उघडून करण्यात येणारा इंटरनेटचा वापर धोकादायक असल्याचे सांगताना रोजगार शोधणाऱ्या व्यक्तींनी ऑनलाइन मुलाखती देणे, लग्न ठरण्यासाठी इंटरनेटच्या माध्यमातून नोंदणी करताना दक्षता घेण्याचेही आवाहन यावेळी करण्यात आले. सोशल मीडियाच्या वापराने परदेशी व्यक्तींकडून अनेकदा ब्लॅकमेलिंग कसे केले जाते याचे स्लाईड शो तसेच विविध उदाहरणे देऊन दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले.

प्रास्ताविक प्रा. व्ही. एन. सूर्यवंशी यांनी करताना महाविद्यालयातर्फे वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती, तसेच महाविद्यालयातील प्लेसमेंट सेलबाबत माहिती दिली. या कार्यक्रमास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन अमित याणी आणि प्रचिती विसावे यांनी केले. तर आभार प्रीती शर्मा यांनी मानले. (प्रतिनिधी)



◆ या कार्यक्रमांतर्गत 'डिजिटलायझेशनमधील संभाव्य धोके आणि त्याबाबत घ्यायची काळजी' या विषयावर गंगापूर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कुटे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पोर्नोग्राफी, टेररिस्ट ॲक्टिव्हिटी, सोशल मीडियावर विविध ग्रुप बनवत संदेशाची देवाण-घेवाण कशी केली जाते, स्किमर, चाट रेकॉर्डर तसेच फिशिंग मेल आदि प्रणालींद्वारे पासवर्ड कसे हॅक केले जातात, याबाबत माहिती दिली. तसेच संकेतस्थळाला भेट देताना गुगल सर्च इंजिनमधून संबंधित संकेतस्थळाचे शब्द टाइप न करता थेट यूआरएल टाइप करण्याच्या सूचना कुटे यांनी यावेळी दिल्या.